# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# येशू आणि जक्कय




लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Janie Forest
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: Ruth Klassen



60 गोष्टींतील 53 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


मराठी

Marathi



एके दिवशी, येशू यरीहो शहरातून गेले. फार वर्षांपूर्वी यहोशवाने या शहराचा नाश केला होता. ते शहर पुन्हा वसवण्यात आले होते व आता त्या शहरात पुष्कळ लोक राहात होते. त्या लोकांपैकी जक्कय नावाचा एक मनुष्य होता.

1



तो इतर लोकांकडून कर वसूल करित असल्यामुळे तेथील इतर लोकांना जक्कय कदाचित आवडत नसावा. तो जकातदार होता. जक्कय काही पैसा सरकारी खजिन्यात जमा करीत असे परंतू पुष्कळ पैसा स्वतःसाठी ठेवून घेत असे.

2


कर वसूल करणारा असल्यामुळे जक्कय फारच श्रीमंत बनला होता. म्हणून कदाचित तो राहात होता त्या विभागात त्याचे घर सर्वांपेक्षा अधिक मोठे व चांगले असावे.
3


परंतू त्याची उंची कमी होती – पैशांच्या बाबतीत नव्हे, परंतू त्याच्या शरीराच्या उंचीत तो कमी होता, म्हणजे तो ठेंगणा होता. इतर लोकांऐवढी जक्कयची उंची वाढली नव्हती.
4


येशू यरीहो शहरात आहे असे जेंव्हा जक्कयला कळले, तेंव्हा त्या ठेंगण्या जकातदराला नासरेथ येथील येशू नावाचा मनुष्य जो स्वतःला देवाचा पुत्र म्हणवतो त्याला पाहण्याची इच्छा झाली. परंतू येशूच्या भोवती फारच दाट गर्दी होती... उंच उंच लोक होते.
5


जक्कयला एक युक्ति सुचली ! जर तो गर्दीच्या पुढे जाऊ शकला... आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडवर जर चढू शकला... तर तो येशूला पाहू शकेल.
6


तेंव्हा तो उंबराच्या झाडावर चढला, आणि येशू दिसेल अशी सुविधा करुन तो झाडाच्या फांदीवर बसला. "येथून मला येशूला चांगले पाहता येईल" असे कदाचित तो स्वतःशीच म्हणाला असेल. "मी कोणाच्या नजरेस न येता त्याला पाहिन."
7


"जक्कया लवकर कर आणि खाली उतर." या वाणीवर तो ठेंगणा जकातदार विश्वासच करु शकत नव्हता. येशू त्या झाडाच्या खाली थांबला होता. येशू त्याच्याकडे पाहात होता. येशू त्याला हाक मारत होता !
8













येशू आणि जक्कय

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

लूक १९

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!